
# परात्मता – हिंसा – पुरुष

चंद्रशेखर पुरंदरे



**प्रस्तावना व लेखाची मांडणी**

कालिदासाच्या मेघदूतावर रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात, 'आपण सारेच यक्ष आहोत.' त्यांची ही प्रतिक्रिया परात्मता ही संकल्पना अक्षरशः चार शब्दांत सांगते. आपण ती जरा विस्ताराने पाहू!

हा शोध घेण्याचे समकालीन प्रयोजन म्हणजे माणसांचे वाढते तुटलेपण आणि आंतरराष्ट्रीय युद्धांपासून, घरापर्यंत व स्वत:पर्यंत अखंड दिसणारी हिंसेची साखळी. यात पुरुष व स्त्रिया दोघेही होरपळतात. त्यातील परात्मता-हिंसा-पुरुष या अक्षाचा वेध येथे घेतला आहे. लेखात प्रस्थापित धर्मांचा आढावा अपरिहार्य आहे. धर्म हा विषय नाजूक आहे. म्हणून प्रथमच नि:संदिग्धपणे हे स्पष्ट करतो की मला कोणत्याही धर्मव्यवस्थेबद्दल, देवाबद्दल, प्रेषिताबद्दल किंवा प्रेषितांच्या अनुयायांबद्दल अनादर नाही. माझा तो अधिकार नाही. पण मला स्वत:ला आध्यात्मिक मिती नसल्यामुळे लेखामागची भूमिका एक इहवादी अभ्यासक अशी आहे. इहवादी भूमिका म्हणजे देव (ऐतिहासिक असलाच तर), प्रेषित किंवा त्यांचे भाष्यकार हे त्या-त्या स्थलकालाची निर्मिती होते. त्यांना माणूस म्हणून मर्यादा होत्या. त्यांनी सांगितले ते चिरंतन सत्य मानावे या दाव्याबद्दल मी साशंक आहे. त्यांची दिव्यत्वाची अनुभूती नाकारण्याचा उर्मटपणा मला अभिप्रेत नाही. मुद्दा ही अनुभूती जनसामान्यांपर्यंत किती पोचली हे पाहण्याचा आहे.

लेखात प्रथम हिंदू व बौद्ध धर्मातील परात्मतेच्या प्रतिध्वनींची दखल घेतली आहे; नंतर पाश्चात्य विचारांचा गोषवारा आहे. या तात्त्विक चर्चेनंतर मुस्लिमांची विद्यमान परात्मता व अतिसंक्षिप्ततेने आफ्रिकनांचे परात्मता कमी करण्याचे प्रयत्न याचा आढावा आहे. मग हिंसा म्हणजे काय व वर उल्लेख केलेल्या अक्षाचा अभ्यास आहे.

**धर्म**

रूढ धर्मांपैकी बरेच एका प्रेषिताने स्थापन केलेले आहेत. ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम, बौद्ध, जैन, वगैरे. काही अनेक स्रोतांपासून उदयाला आले आहेत. ईशान्य भारत, आफ्रिका, दक्षिण आशिया व इतरत्रचे तद्देशीय - आदिवासी, वनवासी वगैरेंचे धर्म व हिंदू धर्म.

दु:ख, भीती, सामाजिक विषमता याबरोबरच (किंबहुना यामुळे येणारी) परात्मताही धर्म जन्माला येण्याचे एक कारण असावे. परात्मता अगदी समूळ गेली नाही, तरी कमी व्हावी म्हणून भौतिक परिस्थितीनिरपेक्षतेने माणूस धर्माकडे वळतो. पण कोणताच देव किंवा प्रेषित स्पष्टपणे उपदेश करतात असे दिसत नाही. उदाहरणार्थ भगवद्गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील दुसऱ्या श्लोकात अर्जुन श्रीकृष्णाला विनंती करतो :

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्॥

ज्ञानेश्वर हा श्लोक स्पष्ट करताना म्हणतात :

मी आधीचि काही नेणे। परि कवळिले मोहे येणे
श्रीकृष्णा विवेकु या कारणे। पुसिला तुज॥

म्हणजे, तुझ्या संदिग्ध उपदेशाने माझा गोंधळच वाढत आहे. तेव्हा श्रेयस्कर मार्ग कोणता हे मला नि:संदिग्धपणे सांग. यानंतर जवळजवळ सगळीच भगवद्गीता येते.

बौद्ध धर्मात कात्यायन आणि त्याच्या बरोबरच्यांना भगवान बुद्धांनी केलेला उपदेश प्रमाण मानला जातो. भगवान बुद्धांचे हे पहिले अधिकृत प्रवचन. कात्यायन बुद्धांना विचारतो, 'योग्य जीवनदृष्टी कोणती?' (अर्जुनाच्या शब्दांत 'श्रेयस्कर मार्ग कोणता?') तिथपासून भगवान बुद्धांचे उपलब्ध वाङ्मय सुरू होते. (लेखात यापुढे 'बुद्ध' ही संज्ञा एकवचनी वापरली आहे, त्यात अनादर नाही.)

या उदाहरणांमध्ये अर्जुन व कात्यायन हे सावध, बुद्धिमान पण संदेहग्रस्त सामान्य माणसाचे प्रतीक आहेत. एकाला श्रीकृष्ण उपदेश करत आहे, दुसऱ्याला बुद्ध. पण प्रश्नकर्त्याचा स्पष्टपणा ना देवाच्या उपदेशात दिसतो, ना प्रेषिताच्या. भगवद्गीताच काय, त्या आधीचे व नंतरचे हिंदू धर्मग्रंथ किंवा बुद्धाच्या या प्रथम प्रवचनानंतरचे प्रचंड बुद्ध वाङ्मय, निरुपणे, भाष्ये प्रश्न टाळतात की काय असेच वाटते.

याची कारणे दोन-तीन असावीत. एकतर 'सोपे' उत्तर नसावे. दुसरे म्हणजे अनुभूती व शाब्दिक भाषा यातील दरी अपरिहार्य असावी. रजनीश 'भगवान/ओशो' होण्याआधी फक्त आचार्य होते, तेव्हाची पुण्याच्या नव्या पुलाजवळची संघवी स्टील कारखान्याबाजूची प्रवचने मी प्रत्यक्ष ऐकली आहेत. किंवा जे.कृष्णमूर्तींचे जे.जे.स्कूल ऑफ आर्टमध्ये होणारे वार्षिक व्याख्यानही खास तेवढ्यासाठी मुंबईला जाऊन मी काही वर्षे ऐकत असे. या दोन्ही ठिकाणी मला हाच अनुभव आला. धर्म-परात्मता याबाबत नेमकी त्रुटी हीच दिसते. सामान्य माणूस ज्ञानी माणसाकडे ज्या अपेक्षेने जातो, ती पुरी होत नाही. तिसरी शक्यता म्हणजे श्रीकृष्ण किंवा भगवान बुद्ध वर म्हटल्याप्रमाणे, त्यांच्या काळाची निर्मिती होते. त्यांच्याकडून त्रिकालाबाधित सत्याची अपेक्षाच चूक असावी. त्यांनी त्या स्थलकालात जे ज्या शब्दांत सांगितले, ते संदर्भच आज बदलल्याने त्यांच्या वचनांचा अर्थ ज्याला हवा तसा त्याने लावावा अशीही परिस्थिती आली असेल. उदाहरणार्थ जहाल मूलतत्त्ववादीही धार्मिक ग्रंथांचा हवाला देतात आणि ते कसे चुकीच्या मार्गावर आहेत हे सांगणारेही त्याच धार्मिक ग्रंथांचा हवाला देतात! म्हणजे परात्मतेचा मूळ प्रश्न बाजूला तर राहतोच पण त्यात भरही पडते.

धर्म-परात्मता संदर्भात भक्तिपंथाचे उदाहरण लक्षणीय आहे.

कृष्ण हा एकच पती असू शकतो ही संत मीराबाईंची श्रद्धा. यादृष्टीने इहलोक, त्यातील वैभव, लग्नाचा पती या साऱ्याबाबत तीव्र परात्मता दिसते. किंवा संत ज्ञानेश्वर. ते तर वाळीत टाकलेल्या दांपत्याचे, त्यातही पोरक्या अपत्यांपैकी एक. संत तुकाराम व्यवसाय-संसार सोडून डोंगरावर जाऊन चिंतन करत. म्हणजे वैराग्य हे परात्मतेचे भारतीय नाव वाटावे. भक्तिपंथातून आलेल्या सामाजिक निष्क्रियतेचेही परात्मता हे एक कारण असू शकते.

**पौर्वात्य धर्म व परात्मता**

यासाठी हिंदू व बौद्ध या प्रमुख विचारधारांचा परामर्श घेतला आहे. प्रथम एक गोष्ट दिसते ती म्हणजे दोन्ही ज्ञानव्यवस्थेत फार फरक दिसत नाही. दोन्ही धर्म परात्मता गृहीत धरतात. काम-लोभ-क्रोध-मद-मोह-मत्सर हे षड्रिपु किंवा कर्म - या ना त्या प्रकारे मनुष्य स्वत:ला अशुद्ध करतो. मग मोक्ष किंवा निर्वाण हा या शुद्धीकरणाचा प्रवास होतो. त्या तुलनेत पाश्चात्य विचारात मनुष्य गृहीत धरून परात्मता हा मानवी विशेष मानला जातो. हिंदू-बौद्ध तात्त्विक विचार मनुष्य हीच संकल्पना अस्थिर मानतो. तो बंधमुक्त होणे म्हणजे त्याचे व्यक्तित्व विरघळणे या दिशेने प्रयत्न होतो. पाश्चात्य विचारात माणूस घट्ट राहतो. प्रश्न असतो तो त्याची परात्मता समजून घेण्याचा.

हिंदुधर्मात प्रमुख भीती पुनर्जन्माची दिसते. जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्तता हे मानवी जीवनाचे ध्येय असावे हा आग्रह आहे. शंकराचार्यांची 'माया' या दृष्टीने पाहता ते तर परात्मतेचे वर्णन वाटावे. जे खरे नाही ते खरे वाटणे म्हणजे माया. मी इथला नाही, मला इथल्या गोष्टी बांधत नाहीत ही परात्मता. माया मनुष्याला जन्म-मृत्यूच्या चक्रात अडकवते म्हणून मोक्ष साधना. पण मुळात मोक्ष (किंवा निर्वाण) ही संकल्पनाच विवाद्य वाटते, त्यात ती बहुसंख्यांना प्राप्यही नाही.

याला संलग्न हिंदुधर्मातील दुसरा आग्रह म्हणजे देह व आत्मा यांची फारकत. देह अशुद्ध, विनाशी तर आत्मा शुद्ध, अविनाशी हे द्वंद्व.

अपरोक्षानुभूतीमध्ये शंकराचार्य वारंवार हा भेद सांगतात.

'आत्मा ज्ञानमय: पुण्यो, देहो मांसमयोऽशुचि:।' किंवा

'आत्मा प्रकाशक: स्वच्छो, देहस्तामस उच्यते।

तयोरैक्यं प्रपश्यन्ति किमज्ञानमत: परम्॥' म्हणजे आत्मा प्रकाशमान आहे, देह तामस आहे. दोन्ही एकच आहेत असे मानण्याहून मोठे अज्ञान नाही, इत्यादी.

त्यामुळे हिंदुधर्मात शरीर ही सामान्यत: एक अडचण होते.

योगामध्ये या अडचणीचेही साधनेचे साधन म्हणून कसे परिवर्तन करता येईल याचा विचार आहे. म्हणजे तेथेही या अशुद्ध साधनाला ब्रह्मज्ञानासाठी कसे शुद्ध करता येईल, ही दिशा आहे.

याच अपरोक्षानुभूतीत शंकराचार्य म्हणतात, मी शरीर नाही; शरीर ज्या पाच तत्त्वांपासून बनले, ती तत्त्वेही नाही; मी या सगळ्यापेक्षा निराळा आहे. साधकाच्या विचाराची ही दिशा असावी. (शरीरापासून दुरावा ही एक परात्मताच.) बहुसंख्यांना हे शक्य नाही. त्यावर उत्तर म्हणून श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतो - मामैकं शरणं व्रज। मला शरण ये. बायबलमधील संत मॅथ्यूचे वचन प्रसिद्ध आहे - ...and teaching them to obey everything I have commanded you. And surely I am with you always, to the very end of the age/time/world.

(शेवटचे तीन पर्याय पाठभेदानुसार.)

म्हणजे, निर्णयकर्ता तू नाहीस. माझ्यावर श्रद्धा ठेव आणि तू कर्म कर. इस्लामही हेच सांगतो. म्हणजे मुळात तू अपूर्ण आहेस ही भावना दृढ करायला धर्म पाहतो. वस्तुत: माणूस अपूर्ण आहे हे सांगायला धर्माची आवश्यकताच नाही! त्यात धर्मामुळे या अपूर्णतेवर औषध मिळण्याऐवजी ती भावनाच अधिक तीव्र होताना दिसते. हिंदू धर्माप्रमाणचे बौद्ध धर्मही मानवी अस्तित्वाच्या ग्राह्यतेविषयी संशय निर्माण करतो. बुद्धाच्या स्वत:च्या शिकवणुकीत याबाबत संदिग्धता दिसते. वर म्हटल्याप्रमाणे तो शाब्दिक भाषेचा अपुरेपणा असावा किंवा तर्कशास्त्राने (परत शाब्दिक) निर्वाणाप्रत जाणे कठीण आहे असे बुद्धाचे मत असावे.

नागार्जुन हा बुद्धाचा प्रमुख भाष्यकार. त्याच्या मते -

अशुभं वा शुभं वापि कुतस्तेषु भविष्यति।

मायापुरुषकल्पेषु प्रतिबिम्बसमेषु च॥

म्हणजे, शुभ किंवा अशुभ या संज्ञांनाच अर्थ नाही कारण या संज्ञा वापरणारा माणूसच माया आहे, केवळ आरशातील प्रतिबंब आहे.

म्हणजे वास्तव हे वास्तवच नाही हा हिंदू आणि बौद्ध धर्मांचा रोख आहे. (काही पाश्चात्य तत्त्वज्ञही विसाव्या शतकात या दिशेने वळले पण ते एकतर इतक्या टोकाला गेले नाहीत किंवा भाषेच्या विश्लेषणातच अडकून पडले. उदाहरणार्थ, अशा एका विचारानुसार अभिप्रेत असणारा अर्थ व्यक्त लिहिण्या/बोलण्याच्या नेमका उलटाही असू शकतो. हा 'मागचा' किंवा 'आतला', 'खोलातला' अर्थ प्रत्यक्ष भाषेद्वारे व्यक्तच होत नाही. या विचाराने धर्मग्रंथ, प्रेषितांची वक्तव्ये अस्थिर ठरतील!)

वर उल्लेख केलेले कात्यायनसूक्त बौद्ध धर्मात प्रमाण मानले जाते. सुखलोलुपता व आत्मक्लेश ही दोन टोके टाळून 'मध्यममार्ग' स्वीकारावा म्हणजे ज्ञान/शांती प्राप्त होईल हे बुद्धाचे प्रमुख तत्त्व. नंतर या मध्यममार्गाचे अनंत अर्थ काढले गेले, अनेक टीका झाल्या पण त्यामुळे स्पष्टीकरण होण्याऐवजी गुंतागुंतच वाढत गेली आणि भिन्न पंथीयांच्यातील वैमनस्यही वाढले.

बौद्ध धर्म ज्या ज्ञानव्यवस्थेत जन्माला आला, ती लक्षात घेतली पाहिजे. वैदिक धर्माने अस्तित्व व नास्तित्व हे मूलभूत विभाजन केले व अस्तित्ववादाचा पुरस्कार केला. अस्तित्व म्हणजे केवळ दृग्गोचर देह अस्तित्व नव्हे तर शाश्वत आत्म्याचेही अस्तित्व. मग आत्मा ब्रह्मात विलीन होणे हा प्रयास. नंतरच्या वर्णव्यवस्थेबरोबर आत्म्यावर तेही बंधन आले.

या विचाराला दोन आह्वाने आली. एक नास्तित्ववाद्यांचे. त्यांनी आत्माही नाकारला आणि त्याबरोबर मरणोत्तर अस्तित्वही नाकारले. त्याबरोबरच मानवी कृत्यांचे नैतिक उत्तरदायित्वही नाकारले. त्याऐवजी (आजच्या परिभाषेत) इहवादी चार्वाक विचाराने भौतिकतेचा सिद्धांत मांडला.

दुसरे आह्वान दिले ते बुद्धाने. त्याने वैदिक अस्तित्ववादही नाकारला आणि भौतिक नास्तित्ववादही नाकारला. जीवनाकडे पाहण्याची योग्य दृष्टी म्हणून मध्यममार्ग सांगितला. मध्यममार्गाचे प्रमुख तत्त्व म्हणजे (पर) अवलंबी जीवन (माझे शब्द) (प्रतीयसमुत्पाद). दु:ख का असते याच्या कारणांची एक मालिकाच आहे. प्रत्येक पुढची पायरी आधीच्या पायरीतून उद्‌भवते. ही बारा 'निदाने' म्हणजे कारणमीमांसा अशी -

अविद्या - संस्कार - विज्ञान - नामरूप - षडायतन (सहा ज्ञानेंद्रिये) - स्पर्श - वेदना - तृष्णा - उपादान (इच्छापूर्तीत गुंतणे) - भव (अस्तित्व) - जाति (जन्म) - जरामरण (वार्धक्य व मृत्यू) त्यानंतर दु:ख, शोक, क्लेश, हताशपणा आणि नैराश्य अशी ही मालिका. (यातील संस्कार, विज्ञान, स्पर्श या संकल्पना बुद्ध आजच्या अर्थांनी वापरत नाही पण तितक्या खोलात जाण्याची जरूर नाही.)

मूळ मुद्दा म्हणजे, पहिली 'अविद्या' दूर झाली, की शेवटचा नकारात्मक परिणामही लोप पावेल (कारण ही कारण-मीमांसा आहे) म्हणजे परत प्रश्न अज्ञानावर येतो. त्या अर्थी ज्ञानाच्या साधनेत हिंदू व बौद्ध धर्मात फरक दिसत नाही. भगवद्‌गीतेतील पाचव्या अध्यायात ज्ञानाची महती आहे. 'ज्ञानाच्या सूर्याने सगळा अंधार नष्ट होतो', 'ज्ञानाहून पवित्र काही नाही' इत्यादी. अर्थात, बुद्धाला अभिप्रेत असणारे ज्ञान व गीतेला अभिप्रेत असणारे ज्ञान हे निराळे आहेत असा आक्षेप घेता येईल. पण त्यामुळे शब्दच्छल वाढेल. 'ज्ञान' म्हणजे काय हे अनुत्तरित तरी राहते किंवा अप्राप्य तरी राहते. आत्मज्ञान-ब्रह्मज्ञान-ज्ञान या पुस्तकी व्याख्या राहतात.

दु:खाची कारणे शोधण्यासाठी अशा घटना घडवणारी कोणती तरी एक गूढ शक्ती आहे हे बुद्धाला अमान्य आहे. त्याच्या मते त्या-त्या दु:खाची नजीकची कारणे व सभोवतालचा कार्यकारण भाव माणसाने पहावा. ती योग्य जीवनदृष्टी. ही जीवनदृष्टी सत्य-असत्य हे वैदिक धर्माचे निश्चित विभाजन मानत नाही. सत्य-मृषा हे द्वंद्व पुढे आले. पण बुद्धाचे 'सत्य' वैदिक 'अंतिम सत्य-ब्रह्म' नाही. मृषा (भ्रम) 'मिथ्या'ही नाही. दुसऱ्या शब्दांत, इथे बौद्ध धर्म वरवर सोपा दिसला तरी हिंदूधर्माइतकाच क्लिष्ट होताना दिसतो.

अस्तित्वावरचा बौद्ध धर्माचा आक्षेप पाहिला म्हणजे तो परात्मतेला किती हातभार लावतो हे स्पष्ट होईल. वेदांती हिंदू धर्माचा अस्तित्ववाद नाकारण्यामागे बुद्धाची भूमिका अशी की अस्तित्ववादी निसर्गातील निरोधच नाकारतात कारण सगळे 'असतेच.' निरोध म्हणजे व्यय किंवा विलय. पण त्याचवेळी अस्तित्ववाद नाकारणे म्हणजे नास्तित्ववाद स्वीकारणे नव्हे कारण नास्तित्ववादी जीवनातील सातत्य व शाश्वतताच नाकारत नाहीत तर अनुभवातून जमा झालेली आयुष्यातील इतर मिळकतही नाकारतात. म्हणजे बुद्ध परत प्रचलित शाब्दिक भाषेच्या पुढे कसे जावे या पेचात पडलेला दिसतो. पेच अर्थातच वाचकाचा किंवा साधकाचा म्हणता येईल. (हेच निरीक्षण एका पाश्चात्य अभ्यासकाचेही आहे - ... linguistic conventions of his day did not provide the Buddha with technical terms to express...)

हा पेच सनातन आहे आणि अर्वाचीनही आहे. आजही राजकीय परिभाषेत 'डावा' कोण, 'मध्यममार्गी' कोण आणि 'उजवा' कोण हे सांगणे कठीण आहे! प्रश्न निर्माण होतो तो प्रेषिताच्या भाषेतून किंवा प्रेषिताची भाषा आपल्यापर्यंत कशी पोचते यातून. बुद्धोत्तर काळात बुद्धाच्या वचनांचा अर्थ लावताना एक विचार पुढे आला. तो म्हणजे सर्वसामान्यांना कळण्यासाठी सोपी भाषा बुद्धाने काही प्रवचनात वापरली तर वरच्या थरावरच्या अनुयायांसाठी तो अधिक खोलात गेला. एकतर कोणताच प्रेषित अशी दुहेरी योजना करत नाही. दुसरे म्हणजे ती केलीच तर संभ्रम वाढतो. तिसरे, आणि महत्त्वाचे म्हणजे, बुद्धाच्या शिकवणुकीतील संदिग्धता ना 'सोप्या' प्रकारात कमी होताना दिसते, ना 'क्लिष्ट'.

बौद्धधर्माचा अभ्यास करताना आणखी एक गोष्ट जाणवते, ती म्हणजे त्या धर्माचे, विशेषत: बुद्धाचे, तत्कालीन हिंदूधर्माशी सतत द्वंद्व चाललेले दिसते. त्यामुळे काही वेळा काही संकल्पनांबाबत केवळ त्या हिंदुधर्मात आहेत म्हणून ते शब्दप्रयोग टाळून नवीन शब्दप्रयोग (मग परत त्यांचे खुलासे आले) केलेले दिसतात किंवा त्या संकल्पनेवर भाष्यच टाळलेले दिसते. उदाहरणार्थ कार्यकारणभावाच्या संदर्भात 'स्वयंकृत'अशी त्यावेळच्या हिंदुधर्मात एक संकल्पना होती. म्हणजे माझ्याच कर्माची फळे मला मिळतात. पण ही संकल्पना स्वीकारायची तर 'स्वयम्' स्वीकारायला हवा. पण 'स्वयम्' तर 'आत्मा' या आध्यात्मिक संकल्पनेतून आलेला आहे. आणि बुद्धाला तर आत्मा ही संकल्पना टाळायची आहे. त्यामुळे कारणमीमांसेसाठी वर म्हटलेली

अवलंबनाची मालिका पुढे आली.

**पाश्चात्य विचारवंत व परात्मता**

येथे मार्क्सपासून सुरूवात करू. कार्ल मार्क्सच्या मते भांडवलशाही समाजातील कामगार चार प्रकारची परात्मता अनुभवतो. एकतर तो जे उत्पादन करतो, ते लगेचच त्याच्यापासून दूर नेले जाते. स्वत:च्या निर्मितीपासूनची विभक्ती ही पहिली परात्मता. उपजीविकेसाठी उत्पादनाचे ते काम करायला लागणे ही दुसरा परात्मता. तिसरी परात्मता म्हणजे माणूस म्हणून त्याच्या संपूर्ण क्षमतेतील फक्त बाजाराला आवश्यक एवढीच क्षमता उत्पादनासाठी उपयोगात येते. चौथी परात्मता म्हणजे उर्वरित बृहत् समाजापासून कामासाठी सक्तीने अलग व्हायला लागल्यामुळे समुदायातील देवघेव, परस्पर-विश्वास, इतरांची आवश्यकता या गोष्टी नाकारल्या जातात. त्यात अनेकदा आपले उत्पादन (किंवा त्यातील आपला अंशत: सहभाग) उद्या बाजारात आपल्याच विरुद्ध उभे राहू शकते. (उदा. मारूती कार बनवणाऱ्या कारखान्यातील कॉंट्रॅक्ट लेबरला ती कार विकत घ्यायला परवडणे शक्य नसते.) फक्त आर्थिक हितसंबंधांमुळे हे घडत नाही तर त्यामागे धर्म व राष्ट्र-राज्य सक्रिय असतात. त्यात या परात्मतेवर कामगाराचे नियंत्रणही नसल्याने ती अधिक गडद होते. मार्क्सचे विवेचन १९व्या शतकातील असले तरी आजच्या कॉलसेंटरसारख्या व्यवसायांनाही ते लागू दिसते. मार्क्सचा समकालीन ब्रुनो बाउअर (Bruno Bauer) या तत्त्वज्ञाच्या मते (ख्रिश्चन) धर्म हा परात्मतेचा एक आविष्कार आहे. इहलोकाच्या अपूर्णतेमुळे अतार्किक, आधिभौतिक शक्तीचा शोध लावण्यात आला. धार्मिक वाङ्मय केवळ शाब्दिक कसरती आहेत, त्यांना कोणताच ऐतिहासिक आधार नाही, अशी मिथके रचणे ही भूतकाळातील सरंजामशाही शाबूत राखण्याची त्यावेळची गरज होती. म्हणजे, राष्ट्र-राज्य व नागरिकांचा एक गट यांच्या संगनमताने धर्माची रचना झाली. खासगी मालमत्ता स्वीकारणारी मुक्त विचारधारा हे या परात्मतेचे उत्तर नाही व समाजवादही उत्तर नाही. समाजवाद फारतर कामगारांना संघटित करेल, त्यांची मानसिकता बदलत नाही. (हे निरीक्षण आजच्याही अनेक चळवळींना लागू पडते!)

बाउअरनंतर विसाव्या शतकात परात्मतेचा अभ्यास पाश्चात्य अस्तित्ववादी विचारधारेने बराच पुढे नेला पण तो सामूहिक परात्मतेपासून वैयक्तिक परात्मतेच्या दिशेने गेला. (कारण तोपर्यंत पश्चिमेत तेवढी सुबत्ता आली होती.) त्यानुसार व्यक्तीची परात्मता दुहेरी असते. एक बृहत्समाजापासून, दुसरी स्वत:पासून. बृहत्समाजाच्या जडणघडणीत माझा थोडा वाटा असला तरी समाज काही माझ्यावर अवलंबून नसतो. त्याचे कामकाज माझ्याशिवाय चालूच राहते. त्यामुळे मला तो समाज परका वाटतो. विश्वाच्या रचनेत माझे (प्रत्येकाचे) एक विशिष्ट स्थान आहे या धार्मिक श्रद्धेला उद्देशून हे प्रतिपादन आहे. स्वत:पासूनची परात्मता कशामुळे निर्माण होते? तर समाजात इतरही असतात. मी स्वत: काही जग चालवत नाही, इतरांच्या कृती ते चालवतात. त्यामुळे मी कसा असतो हा माझा वैयक्तिक उप्रकम राहत नाही. मी इतरांसाठी कसा असतो यावर ते ठरते. सार्त्रच्या उदाहरणाप्रमाणे विचार बाजूला ठेवून किंवा स्वत:ला विसरून जेव्हा मी एखाद्या उपक्रमात मग्न असतो तेव्हा मी जगा'बाहेर' नसतो. पण जेव्हा दुसरा कोणी मी काय करत आहे ते पहात आहे ही जाणीव मला होते, तेव्हा माझे स्वत्व, स्वभाव जागे होतात. कारण दुसरा माझ्याकडे त्याच्या जगाचा एक भाग म्हणून पहात असतो. मग मीही स्वत:कडे तटस्थतेने पाहू लागतो. ही परात्मता.

जगाशी होणारी माझी देवघेव माझी स्वत:ची नसते. ही देवघेव माझी संपूर्ण क्षमता उपयोगात आणत नाही कारण माझ्या जागी दुसरा कोणीही असला तरी त्या भूमिकेत तो जगाशी तीच देवघेव करेल. याचे कारण म्हणजे ही देवघेव रूढ सामाजिक संकेतांनुसार होते. इतर खातात, पितात तसाच मीही खातो, पितो; इतर एखाद्या सामाजिक धोरणाचा निषेध करतात, तसाच मीही निषेध करतो. अगदी समाजाच्या परिघावरचे वेगळे वागणारे असतात, तेही या सामाजिक संकेतांविरुद्धच. मी कसे वागणे अपेक्षित आहे त्याची व्याख्या माझा समाज, माझी संस्कृती यांनी केलेलीच असते. ही व्याख्या 'सर्वसाधारण' माणसाने कसे वागावे यावर आधारित असते. हा बिनचेहेरेपणा माझी परात्मता होतो.

ज्यां बोद्रिया (Jean Baudrillard) या फ्रेंच तत्त्वज्ञाने परात्मतेचा शोध समकालीन उपभोक्ता समाजव्यवस्थेत घेतला. एखाद्या वस्तूची विक्रयशीलता हा मार्क्सच्या सिद्धांताचा एक पाया होता तर ब्रोद्रियाच्या मते उपभोक्ता समाजात वस्तूचे प्रतीक-मूल्य केंद्रस्थानी असते. माझे घर, माझी कार, माझे कपडे यावरून समाजातील माझे स्थान ठरते. अशा प्रतीकमूल्यांचा दास झालेल्या समाजात परात्मता त्याप्रमाणात वाटते. कारण अशा संस्कृतीत माणसांना आपल्या खऱ्या व किमान गरजा काय किंवा जगण्याची एखादी निराळी पद्धत असू शकते याचेच भान राहत नाही. माणसेच प्रतीकमूल्ये असणाऱ्या वस्तू झाली आहेत. घर-गाडी-कपडे याखेरीज मला अस्तित्वच नाही. त्यामुळे परात्मता हे बाजारी समाजाचे गमकच आहे. अशा समाजाची मूल्ये ठरवतात ती कर्कश प्रसारमाध्यमे, त्यांचे आदर्श आणि कॉम्प्युटरसारखे विलोभनीय तंत्रज्ञान.

एक गोष्ट इथे लक्षात यावी की बोद्रिया समाजातील सगळ्यात खालचा थरही चंगळवादी उपभोक्ता आहे हे गृहीत धरतो तरी भारतीय उच्च व मध्यमवर्गाला हे विश्लेषण लागू पडावे.

हाना आरेंट (Hannah Arendt) या विदुषीच्या मते आधुनिकता म्हणजे नोकरशाही, बिनचेहऱ्याची मजुरी, आहे-रे वर्गाचे प्रभुत्व आणि त्या वर्गाने जनमत आपल्या सोईच्या दिशेने वळवणे. सार्वजनिक कामासाठीचे अवकाश आक्रसत आहे. त्याच्या जागी व्यक्तिकेंद्रित आत्मरतता किंवा संपत्ती जमा करण्याकडे समाज वळला आहे. मूल्यांच्या या ऱ्हासाने परात्मता वाढत आहे.

आरेंटनंतर कूली (Cooley), गिलिगन (Gilligan), एलायस (Elias), शेफ (Scheff) वगैरे विचारवंतांचे प्रतिपादन एकत्रित पाहू. ते परात्मता-शरम-अवहेलना-संताप यांचा संलग्न अभ्यास करतात. कूलीच्या मते -

१. आपल्याला कल्पनाही नसते पण आपण इतरांच्या मनात असतो.

२. 'स्व'चे तीन घटक असतात.

२.१ दुसऱ्याला आपण कसे दिसतो याचे कल्पनाचित्र.

२.२ त्याचे या दिसण्यावरचे आपल्याविषयीचे मत.

२.३ - २.२ बाबत आपली प्रतिक्रिया - ती 'बरे वाटते' अशी समाधानाची भावना असू शकते किंवा शरमेची भावना.

शरम ही नकारात्मक भावना आहे. आपण ती टाळायचा किंवा दडपून टाकायचा प्रयत्न करतो. बहुधा शरम का वाटते याचा आपण विचारच करत नाही. समकालीन समाजातील वाढत्या आत्मकेंद्रिततेने परात्मता वाढते व शरम झाकण्याची वृत्तीही वाढते. शरमेचे दोन पैलू असतात. एक - स्वत:च्या त्या विशिष्ट वर्तणुकीबद्दलचे असमाधान आणि दोन - आपण इतरांना कसे दिसलो या कल्पनाचित्रातून निर्माण होणारी शरम. वर म्हटल्याप्रमाणे व्यक्ती-व्यक्तीतील देवघेव समाधान ही जवळिक दर्शवणारी भावना निर्माण करते किंवा शरम ही दुरावा निर्माण करणारी. शरम नुसती वाटून थांबत नाही तर मला शरम वाटते याचीच मला शरम वाटू शकते. म्हणजे शरमेचे हे दोन थर होतात. तीच गोष्ट संतापाची. अनेकदा तर शरम आणि संताप एकावर एक येतात. उदाहरणार्थ, सिग्नलचा हिरवा दिवा लागला तरी समोरची गाडी का हलत नाही याचा मला संताप येतो आणि अशा क्षुल्लक घटनेने संताप यावा याची शरम वाटते. मी माझ्या गाडीतून उतरून थांबलेल्या गाडीच्या ड्रायव्हरला असे म्हणतो का? 'हे पहा, तुम्ही माझा रस्ता आणि मागचे हॉर्न वाजवणारे अनंत ट्रॅफिक अडवले आहे. त्यामुळे तुम्ही मला किंमत देत नाही असे मला वाटते आणि माझ्या या काल्पनिक अवहेलनेची मला शरम वाटते.' मी तसे म्हणत नाही. गाडीतून


*3 a.m....*

उतरलोच तर त्या माणसाला संतापाने चार शिव्या हासडतो. हा अनुभव काही पटींनी गुणला तर खुनापर्यंत पोचेल किंवा अगदी युद्धापर्यंत. भावनांची अशी दडपणूक साठत राहते. नकारात्मक भावनांचे हे संचित माणसाला हिंसेला प्रवृत्त करते. शरमेचा आणि/किंवा परात्मतेचा आणि/किंवा संतापाचा बोजा इतका असह्य होतो की हिंसा हा एकच पर्याय राहतो. त्या माणसाचा स्वत:वरचा ताबा जातो असे नाही तर हिंसेविरुद्धच्या सामाजिक संकेत, नैतिकता या भिंतीच कोसळतात. हिंसेच्या कोणत्याही खुलाशात अनियंत्रित ताकद आणि नैतिक बंधने झुगारण्याचा अंतर्भाव हवा. हा खुलासा आपण एकटे आहोत, नाकारले जात आहोत या भावनेतून मिळतो. त्यामागचे परात्मता-शरम-संताप हे परस्परपूरक घटक होतात. शरम व संतापाप्रमाणेच परात्मतेचे थर साठतात. नाकारले जाणे किंवा नाकारले गेलो असे वाटणे यातून येणाऱ्या परात्मतेने आपण आणखीच नाकारले गेलो आहोत असे वाटते. हे दुष्टचक्र चालू राहते. त्याने माणूस समाजपराङ्मुख तरी होतो किंवा हिंसक. विशेषत: पुरुषांकडून सामाजिक अपेक्षा 'अपमान ठेवावा मनात' अशी असते. त्यामुळे ही व्यथा जास्त करून पुरुषांमध्येच आढळते. परात्मता-हिंसा-पुरुष या संदर्भात हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

आता व्यक्ती-व्यक्ती नात्यातील परात्मतेचे रूप पाहू. दोन व्यक्तींमध्ये दोन प्रकारे देवघेव होते. एक समरसता, दुसरी दुरावा. समरसतेत दोघांतील बंधन घट्ट असते. दुराव्यात हे बंधन जवळजवळ संपुष्टात आलेले असते. समरसतेमध्ये दोघांपैकी एकाला किंवा दोघांनाही स्वत:चे विचार, भावना, दुसऱ्याचा विचार, भावनांपुढे दुय्यम ठरवावे लागतात. अशा सच्च्या समरसतेत दोघेही एकमेकांची स्वायत्तता स्वीकारतात पण स्वत:ची अस्मिता शाबूत ठेवून. अस्मिता सतत टिकवायची तर हे नाते चालू आहे, तोपर्यंतची ही रस्सीखेच होते. वस्तुत: अशा नात्यात एकाने किंवा दोघांनीही आपल्या अस्मितेच्या मोठ्या भागाला तिलांजली दिलेली असते. व्यक्तिअंतर्गत पहाता ती व्यक्ती स्वत:पासूनच दुरावलेली असते. दोन संपूर्ण स्वतंत्र व्यक्तींमध्ये जी निरोगी देवघेव होऊ शकते ती अशा नात्यात कधीच होत नाही. संपुष्टात आलेल्या नात्यात प्रत्येकाची स्वत:ची परात्मता दुसऱ्यापासून असते. ती समजणे सोपे आहे.

शरम किंवा संताप यांचा संचय होऊ नये यासाठी दोन उपाय सुचवले जातात. एकतर शरम वाटली याची पोचपावती आपण स्वत:ला तरी देणे. त्यामुळे शरमेची शरम तरी वाटत नाही. दुसरे म्हणजे त्याबाबत दुसऱ्याशी बोलणे व त्या प्रसंगाची खिल्ली उडवणे, तो अक्षरश: हसण्यावारी नेणे. पहिल्या उपायाने बोच कमी होईल असे दिसते. दुसरा उपाय व्यवहारात कितपत शक्य आहे याची शंका वाटते. त्यातही, शरम किंवा संताप याचा निचरा या उपायांनी शक्य वाटतो, परात्मतेचा नाही.

(हाच प्रकार मोठ्या प्रमाणावर राष्ट्रांमध्ये होऊ शकतो. १९६२ च्या युद्धात आपला पराभव झाल्याचे शल्य अजून भारतीय मनात आहे. तीच गोष्टी पाकिस्तानी मनात भारत-पाकिस्तान युद्धांच्याबाबत.)

पाश्चात्य विचारातील परात्मता व काही प्रमाणात परात्मता-हिंसा-पुरुष याच्या आढाव्यानंतर दोन समकालीन सामाजिक परात्मतेची उदाहरणे पाहू. तात्त्विक चर्चा बाजूला ठेवू!

**परात्मता आणि इस्लाम**

मुस्लिम धर्माअंतर्गतची परात्मता तीन-चार स्तरांवर पहावी लागेल. त्याआधी माझी एक-दोन निरीक्षणे नोंदवतो. एकतर इस्लाम हिंदुधर्मातील भक्तिपंथासारखा वाटतो. 'मला शरण ये' हे दोन्हीचे मूळ तत्त्व. उपासनेच्या तपशीलात फरक असेल पण एकूण इस्लाममध्ये मुस्लिमेतरांना मुस्लिमेतरांच्या प्रसारमाध्यमांमार्फत जे सांगितले जाते, त्यापेक्षा खूपच जास्त मोकळीक दिसते. ईश्वर-प्रेषित हे अतिसंवेदनाशील बिंदू वारकऱ्यांच्या ज्ञानेश्वर-तुकाराम या श्रद्धास्थानांच्या जवळचे वाटतात किंवा शिखांच्या 'गुरूंच्या.' असे सामूहिक श्रद्धाकेंद्र असले तर परात्मता कमी होत असावी पण त्यासाठी बृहत् जगाशी संपूर्ण फारकत हवी. मुस्लिमेतर जगाशी संबंध हे त्या धर्मीयांचे (भारतीय नाही, विशेषत: ज्वलंत उत्तर आफ्रिका व मध्यपूर्व येथील मुस्लिमांचे) परात्मतेचे कारण दिसते.

पहिला स्तर मुस्लिमांतर्गत दिसतो. या प्रदेशात - प्रामुख्याने पाकिस्तान व तेल नसलेली मुस्लिम राष्ट्रे - गरीबीमुळे व संपत्तीच्या अतिशय विषम वाटपामुळे परात्मता आलेली दिसते. गरीबी-परात्मता हे नाते पुढे हिंसेच्या संदर्भात स्पष्ट होईल. त्यानंतर शिया-सुन्नी वैर. इराण व सध्याचा यादवीग्रस्त सीरिया सोडता बाकी ठिकाणी सुन्नी राजवटी आहेत. पण तेथेही शियापंथीय अगदी ५०%पर्यंतही आहेत. राजवटीच्या पंथाप्रमाणे दुसऱ्या पंथाचा पद्धतशीर छळ केला जातो. काही स्वत:ला मुस्लिम म्हणवणारे पण शिया किंवा सुन्नी नसणारे पंथ तर वाळीत टाकल्यासारखे. आपल्याकडच्या दलितांसारखे पाकिस्तानातील अहमदिया पंथीय मुस्लिम आहेत. त्यांना सरकार व बहुसंख्य समाजच मुस्लिम मानत नाही तर काफिर मानतो व मनमुराद अत्याचार करतो. तीच गोष्ट भिन्नधर्मीयांची. पाकिस्तानातील हिंदू, इजिप्तमधील ख्रिश्चन वगैरे. त्यांना समाजात सामावले जात नाहीच पण इजिप्तमध्ये त्यांच्यावर हल्ले, चर्चेस जाळणे हे प्रकार राजवटीच्या बदलानंतर वाढीसच लागलेले दिसतात. (ते कमी होतील अशी अपेक्षा होती.) त्यामुळे इजिप्त सोडून जाणाऱ्या ख्रिश्चनांची, किंबहुना मध्यपूर्वच सोडून जाणाऱ्या ख्रिश्चनांची संख्या वाढते आहे. अलिकडे पाकिस्तानातही हिंदू, ख्रिश्चन यांच्यावरचे अत्याचाराचे प्रमाण वाढते आहे.

शिया-सुन्नी-इतर पंथीय-इतर धर्मीय यानंतर मुस्लिमांतर्गत वंशद्वेष हिंसा-परात्मता अक्षावर पहायला हवा. उत्तर आफ्रिका-मध्यपूर्व या भागात पाच प्रमुख वंशाचे मुस्लिम आहेत. स्वत:चे राष्ट्र नसलेले कुर्द, तुर्कस्तानमध्ये तुर्क, इराणमध्ये पर्शियन, उत्तर आफ्रिकेत कृष्णवर्णीय व उरलेले अरब. कृष्णवर्णीयांच्यावर अनन्वित अत्याचार, विशेषत: दारफ्यूर प्रांतात अलिकडेच झालेले आहेत. ते अरब मुस्लिमांनी केले. स्त्रियांवर, पुरुषांवर, मुलांवर बलात्कार करणे हे युद्धाचे एक तंत्र होते. बलात्कार केला की त्या स्त्रीचा घोट्याखालचा पाय तोडण्यात येतो जेणेकरून तिच्यावर बलात्कार झाला हे सगळ्या समाजाला कळावे. अशा स्त्रिया दुर्धर विकार, समाजबहिष्कृत जीवन कंठतात. त्यांची परात्मता कल्पनातीत असते.

पादाक्रांत प्रदेशातील युद्धकैदी, लहान मुलगे, सामान्य शेतकरी, मेंढपाळ, मजूर यांच्यावरही बलात्कार होतात. असे पुरुष अनेक पदरी परात्मतेत अडकतात. इस्लाम समलिंगी संभोगाला मरणाची शिक्षा देतो. 'मर्दानी' सामाजिक संकेतानुसार हे 'पुरुष' दुबळे समजले जातात, त्यात अवहेलना, अपमान आणि शारीरिक अत्याचार झालेलाच असतो. याच्या एकत्रित परिणामाने या घटनांना वाचाच फुटत नाही. मग मानसिक विकार होतात. अशा रुग्णांचीच संख्या आजमितीला काही लाखात जाईल. (पुरुषांवरील बलात्कार जगभर आढळतो पण तो वेगळ्या लेखाचा विषय होईल.)

वंशद्वेषाच्या संदर्भात कुर्द लोकांना अरब, तुर्क, पर्शियन तुच्छ मानतात. पर्शियन (इराणी) अरबांना तुच्छ मानतात आणि कृष्णवर्णीयांना हे सगळेच तुच्छ मानतात. प्रश्न फक्त तुच्छ मानण्याचा नाही. (तशी भारतातील प्रत्येक जात इतर जातींना तुच्छ मानते!) प्रश्न राष्ट्र-राज्य कोणाच्या हातात आहे किंवा उत्पादनाची संसाधने कोण नियंत्रित करतो यावर आला की या मुस्लिम जातव्यवस्थेची भयानकता स्पष्ट होते. तुर्कस्तानमध्ये कुर्द लोकांचे राजरोस शिरकाण होते कारण राज्य तुर्कांचे आहे. इराणमध्ये ते बहिष्कृत आहेत कारण राज्य पर्शियनांचे आहे. पहिल्या इराक युद्धानंतर (१९९१) त्यांना उत्तर इराकमध्ये स्वयंनियंत्रित प्रदेश मिळाला. जगभर पॅलेस्टाईनचा गहजब होतो, वस्तुत: कुर्द त्यांच्यापेक्षा संख्येने खूप जास्त आहेत, जास्त हिंसेचे बळी आहेत. (पण त्यांना आवाज नसण्याची कारणे या लेखाशी तशी संबंधित नाहीत.)

मुस्लिम परात्मतेचा पुढचा स्तर म्हणजे युरोप-अमेरिकेत स्थलांतरित झालेले मुस्लिम. गोरा ख्रिश्चन मुख्य प्रवाह त्यांना कटाक्षाने बाहेर ठेवतो. राहण्याची वस्ती, शिक्षण, नोकऱ्या यात त्यांना या व्यवस्थेत आरक्षणही नसते. हे इथले अस्पृश्य. त्यात ११ सप्टेंबर २००१ नंतर त्यांच्याकडे पाहण्याच्या तुच्छतेत संशयाचीही भर पडली आहे. राजवटीही बुरख्यावर बंदी घालण्यासारखे (फ्रान्स) खोडसाळ धोरण असतात. अमेरिकेत या ऑगस्टमध्ये मुसलमान समजून शीख गुरूद्वारावर हल्ला झाला. त्यात सहा शीख ठार झाले. यावरून त्यांच्याविरुद्धच्या बहुसंख्यांकांच्या भावनांची तीव्रता कळावी. पुढचा स्तर म्हणजे मुस्लिम आतंकवादी. त्याच्या मानसिकतेतही परात्मतेचा घटक आहे. वसाहतवाद, प्रगत पश्चिम व इतर मुस्लिमेतर देश, स्त्रीस्वातंत्र्य, लोकशाही राजवटी याच्या तुलनेतील त्या प्रदेशाचा मागासलेपणा, तेल घराण्यांची हुकूमशाही यामुळे इस्लाम धोक्यात असल्याच्या घंटा वाजवल्या जातात. बृहत्‌समाज शांतताप्रिय असला तरी या अल्पसंख्यांकांनी त्याला वेठीस धरल्याचे दिसते. त्याचे एक कारण दहशत, दुसरे लेखाच्या सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे त्याच कुराणाचा दाखला.

त्यातल्या त्यात एका दुर्दैवी घटनेतून दिलासा मिळावा असा अलिकडचा पाकिस्तानातील एक प्रसंग. 'मुलींना शिक्षणाचा हक्क आहे' असे म्हटल्याबद्दल मलाला युसूफझई या चौदा वर्षांच्या मुलीला तालेबानच्या माथेफिरूने गोळ्या घातल्या. त्याच्या निषेधात बहुसंख्य आतंकवाद्यांविरुद्ध रस्त्यावर तरी आले.

मुस्लिम महिला हा आणखी एक भाग. पण त्यावर बरीच चर्चा होते. म्हणून इथे खोलात जात नाही.

**आफ्रिका**

पिढ्यान्‌ पिढ्या युरोपातील गोऱ्या देशांच्या वसाहती असणाऱ्या कृष्णवर्णीयांची अस्मिता मागच्या शतकात जागी झाली. गोऱ्यांनी लिहिलेल्या व निर्माण केलेल्या या संस्कृतीचे चित्र - मागासलेले, अशिक्षित, रानटी असे होते. ते चित्र चुकीचे आहे हे सिद्ध करण्यात बऱ्याच प्रमाणात शतकाच्या उत्तरार्धात यश आले. परंपरेचे पुनरुज्जीवन या दिशेने परात्मता कमी करण्याचा हा प्रयत्न होता. पण त्याचा परिणाम वर्णद्वेषी-वर्णद्वेष असा होऊ शकतो व काही प्रमाणात झालाही. भारतातील हिंदुत्ववाद्यांसारखे परंपरेचे पुनरुज्जीवन ही धोकादायक व अनैतिहासिक प्रक्रिया होते. दरम्यान जागतिकीकरण, कच्च्या मालाचा पुरवठा शोधण्यासाठी चीन-भारत-जपान-अमेरिका यांचा आफ्रिकेतील प्रवेश यामुळे ही परात्मता निराळे रूप घेत आहे. आफ्रिकन कलेचा पुनर्शोध या तशा परिघावरच्या कार्यक्रमाने परात्मता कमी करण्याचा थोडाफार प्रयत्न आहे.

**हिंसा**

हिंसा अनेक प्रकारे, अनेक पातळ्यांवर जगभर होत असते. World Health Organisation ने हिंसेची सविस्तर व्याख्या केली आहे. त्यानुसार 'हेतुत: केलेला शारीरिक शक्ती किंवा सत्तेचा वापर इजा, मृत्यू, मानसिक हानी, खुंटलेली वाढ किंवा हक्क हिरावणे यात होत असेल तर ती हिंसा ठरते. हिंसा स्वत:विरुद्ध, दुसऱ्या

व्यक्तीविरुद्ध किंवा समुदायाविरुद्ध असू शकते.' हिंसा रस्त्यावर, घरात, शाळेत, कॉलेजात, हॉस्पिटल्स्‌मध्ये, तुरुंगात, युद्धभूमीवर अशी सर्वत्र होते. स्वत:विरुद्ध असल्यास स्वत:ला इजा करण्यापासून आत्महत्येपर्यंत होते, कुटुंबात लहान मुले, समवयस्क साथीदार, वृद्ध यांच्याविरुद्ध होते. समुदायात ओळखीच्या व अनोळखी लोकांत होते. एका समुदायाने दुसऱ्या समुदायाविरुद्ध सामाजिक, आर्थिक व राजकीय कारणांनी होते. १५ ते ४४ वयोगटात जगभर हिंसा हे मृत्यूचे एक प्रमुख कारण आहे. जगभर जवळजवळ ५०% हिंसेचे बळी आत्महत्या करणारे असतात, नंतर ३०% खुनांचे बळी असतात. एकूण हिंसेच्या बळीतील ९०% बळी अविकसित किंवा विकसनशील देशांत असतात. (गरीबी-हिंसा हा संबंध असावा.) यातील प्रत्येक प्रकारच्या हिंसेचा अभ्यास शक्य नाही. म्हणून परात्मता व पुरुष यापुरता थोडक्यात विचार करू.

घरातील हिंसाचारातील पती-पत्नी संबंधांपुरता विचार करायचा झाला तर ही हिंसाही जगभर आढळते. ती बहुधा पती करतो. पत्नीला मारहाण करण्यापासून खुनापर्यंत ही हिंसा होते. अस्थिर, गरीब व हिंसक कुटुंबात गेलेले बालपण, कमी शिक्षण, कमी मिळकत आणि तरुण वय असलेले पुरुष अधिक हिंसक असतात. (हा पाश्चात्य समाजशास्त्राचा पूर्वग्रह असू शकतो.) वादाचा किंवा मनाविरुद्ध कोणी वागले तर त्याचा निवाडा हिंसेने करायचा ही बालपणची पालकांची शिकवण पुरुष लग्न झाल्यावर चालू ठेवतो. कमी शिक्षण, कमी मिळकत यामुळे येणारा न्यूनगंड व असुरक्षिततेची भावना हिंसेला कारणीभूत असावेत. जेथे हिंसेविरुद्ध सामाजिक दडपण असते, तेथे हिंसा कमी होताना दिसते. म्हणजे, परात्मता कमी झाली नाही तरी तिचा परिणाम निदान हिंसेत होत नाही. आर्थिक स्तर उंचावला तर हिंसा कमी होते. असे नक्की का होते ते सांगता येत नाही पण ऑस्ट्रेलिया-कॅनडा-अमेरिकेत ही हिंसा कमीत कमी आढळते तर अस्थिर व संघर्षग्रस्त पॅलेस्टाईनमध्ये ५२% विवाहितांवर पती हिंसक अत्याचार करतो. म्हणजे, एकूण सामाजिक स्थैर्याशीही याचा संबंध दिसतो. ज्या वस्तीत सामाजिक भांडवल जास्त असते, म्हणजे व्यक्तीची नजीकच्या सभोवतालशी बांधिलकी जास्त असते तेथे घरगुती हिंसा कमी होते. हाही परात्मता कमी होण्याचा परिणाम असावा.

पुरुषांच्यात स्वत:विरुद्धची हिंसा गरीबीमुळे वाढते. शक्यता अशी आहे की गरीबीमुळे पुरुषावर जास्त ताण येतो कारण पोशिंदा ही सामाजिकदृष्ट्या ठरलेली भूमिका आपण पार पाडू शकत नाही ही जाणीव तीव्र होते. पुढे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा उल्लेख आहे त्यासाठी हा मुद्दा लक्षात ठेवावा.

म्हणजे व्यक्तिगत परात्मता दोन्ही दिशांना जाऊ शकते - घरात ती पत्नीविरुद्ध हिंसा करण्याकडे जाईल किंवा स्वत:चा जीव घेण्याकडे जाईल.

सामूहिक परात्मताही दोन्ही दिशांना जाऊ शकते. गरीब घरातून आलेल्या, शालेय शिक्षण अर्धवट सोडलेल्या, अकुशल व तुटपुंजी मिळकत असणाऱ्या किंवा तीही नसणाऱ्या तरुणांच्या गॅंग्ज् जगभर हिंसक कृत्ये करताना दिसतात. सामाजिक परात्मतेचे अनेक पदर त्याला कारणीभूत असतात. ही गोष्ट विशेषत: भिन्नवर्णीय - मुख्य प्रवाह यांच्या संबंधांत पाश्चात्य देशात आढळते. अमेरिकेत, फ्रान्समध्ये कृष्णवर्णीयांच्या वस्तीत अशा गॅंग्ज् आढळतात. बहुतांशी कृष्णवर्णीय बहुसंख्य गोऱ्या समाजाच्या अगदीच परिघावर असतात. त्यात शिक्षण, नोकरी, राहण्याची जागा व एकूण आयुष्यात पुढे सरकण्याची सामाजिक संधीच नसल्याने त्या वैफल्यातून या गॅंग्ज जन्माला येतात.

आता सामूहिक परात्मता आत्महत्येकडे कशी वळते ते कॅनडातील इन्युइट (Inuit) या तद्देशीयांच्या परिस्थितीवरून पाहू. त्यावरून भारतीय विस्थापितांची मानसिकता लक्षात यावी. कॅनडामध्ये देशातील आत्महत्येचे प्रमाण एक लाखात १५ माणसे इतके आहे. ते प्रमाण इन्युइटमध्ये ६० ते ७५ आहे. त्यातही १५ ते २४ वयोगटाच्या तरुणांमध्ये ते १९५ आहे. हे सगळे पुरुषच. गोरा वसाहतवाद, बदलत्या जगाशी सामावून घेण्याची असमर्थता - मग ती भाषा, संस्कृती, शिक्षण या सगळ्याच कारणांनी असेल, त्यात वर्ण, वंश निराळे या सर्व परात्मतेचा हा परिणाम. जी गोष्ट कॅनडातील तद्देशीयांची, तीच ऑस्ट्रेलियातील तद्देशीयांची. भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसारखेच हे प्रकरण आहे. आत्महत्या करणारे शेतकरीही पुरुषच. आधी म्हटल्याप्रमाणे त्यांना कुटुंबप्रमुख या भूमिकेचे ओझे झाल्याचे दिसते.

एतद्देशीयांच्या जमिनींवर अतिक्रमण करणे हा जागतिकीकरणांतर्गत औद्योगिकीकरणाचा किंवा लवासासारख्या चंगळवादाचा भाग झाला आहे. (त्याआधीही, ईशान्य भारतात सांस्कृतिक वसाहतवाद होता.) आता ओडिशा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, झारखंड इथे आर्थिक व सांस्कृतिक वसाहतवाद याच दिशेला स्थानिकांना नेत आहे. कारण त्यांची ज्ञानव्यवस्था व उपजीविकेची व्यवस्थाच नाकारली जात आहे.

युद्ध आणि परात्मता हा महत्त्वाचा विषय आहे पण त्याचा केवळ उल्लेख लेखमर्यादेत शक्य आहे. इराक युद्धात आजवर १० लाख बळी गेल्याचा अंदाज आहे. बहुतांशी पुरुष सैनिक पण नागरिकांच्यात स्त्रिया व मुलेही. या युद्धामुळे व सीरियातील चालू यादवीमुळे अंतर्गत निर्वासित मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहेत. स्थिर आयुष्य अचानक संपून अनिश्चितता, गरीबी, रोगराई इत्यादी क्लेशांनी परात्मता येते. (त्यात स्त्रियांना लैंगिक अत्याचारांची भीती असते.) या व अफगाणयुद्धाहून परतलेल्या अमेरिकन सैनिकात

फार मोठ्या प्रमाणात मानसिक विकार दिसतात. आत्महत्यांचे प्रमाणही प्रचंड आहे. युद्धातील हिंसेचे हे नंतरचे परिणाम. त्यांना समाजात मिसळणे अशक्य होते. म्हणजे, हिंसा हा पुरुषी नैसर्गिक गुणधर्म नसावा. युद्धबळींच्या नातलगांची जीवनव्यवस्थाही धोक्यात येते. त्या संख्येचा अंदाजही कठीण आहे. त्यांची परात्मता हताशपणात परिवर्तित होते, असे मानता यावे.

युद्धाच्या संदर्भात पोकळ आदर्शवाद, अर्थकारण हे देशभक्तीसारख्या पोकळ संकल्पनांचा आधार घेताना दिसतात.

**निष्कर्ष**

एकूण चित्र पहाता प्रस्थापित धर्म किंवा त्यांचे वर्तमान आविष्कार हे परात्मतेवर उत्तर तर नाहीच पण ते परात्मता वाढवत असल्याचीच शक्यता वाटते. जागतिकीकरण, व्यक्तिकेंद्रितता, प्रसारमाध्यमे, एकूण सामाजिक स्थैर्य हेही घटक महत्त्वाचे दिसतात. परात्मता व हिंसा यांचे अनिष्ट नाते दिसते.

परात्मतेचे चित्रण ललितकला (साहित्य, सिनेमा इत्यादी) जेवढ्या क्षमतेने करू शकतात त्यामानाने मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान ही शास्त्रे अक्षम वाटतात. उदाहरणार्थ, जी.ए.कुलकर्णींचे 'रमलखुणा', आशा बगेंचे 'भूमी' किंवा ब्रिटनमधील ज्येष्ठ नागरिकांच्या भारतात outsourcing वरचा अलिकडचा सिनेमा - The Best Exotic Marigold Hotel.

बृहत्‌समाजाची अजाणता व जाण असली तरी उदासीनता परात्मता वाढवतात. भारतीय जातीव्यवस्थेसारखाच हा प्रकार सर्वत्र दिसून येतो. (जातीव्यवस्थेवर इतरत्र सतत चर्चा होते, म्हणून या संदर्भात या लेखात तो परामर्श घेतलेला नाही.) उदासीन माणसाचे किंवा समुदायाचे उदासीनतेचे कवच त्याच्या स्वत:च्या परात्मतेशी निगडित असते का यावर विचार व्हायला हवा.

याठिकाणी डॉ.आंबेडकरांच्या उद्‌गारांची आठवण येते - 'उदासीनतेवर इलाज नाही.'


***काही प्रमुख संदर्भ :***

*शंकराचार्य : ब्रह्मसूत्र, अपरोक्षानुभूती, उपनिषदांवरील भाष्ये*

*नागार्जुन : मूलमध्यमककारिका, यावरील पाश्चात्य भाष्ये*

*भगवद्‌गीता : मूळ संहिता व पुढील भाष्ये - नीलकंठ, मधुसूदन, भाष्योत्कर्षदीपिका, श्रीधर, अभिनवगुप्त, आनंदगिरी व शंकराचार्य*

*ज्ञानेश्वर : ज्ञानेश्वरी*

*बुद्ध, मार्क्स, बाउअर व इतर विचारवंत : इंटरनेटवरील साहित्य.*

*स्टॅनफर्ड विद्यापीठाचा तत्त्वज्ञान ज्ञानकोष*

*World Health Organisation - हिंसेवरील अहवाल.*



*चंद्रशेखर पुरंदरे*

*www.art-non-deco.com*

*artnondeco@yahoo.co.uk*


❐